सी.बी.टी प्रकाशन

# सिंह आणि ससा



BVBK-0402781

# सिंह आणि ससा

लेखक **शंकर**

चित्रांकन **चित्रक**

अनुवाद **अरुंधती देवस्थळे**

BVBK-0402781

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नवी दिल्ली

एका जंगलात एक भलामोठा सिंह रहात असे. सिंह एवढा मोठा आणि त्याची भूक एवढी प्रचंड होती की तो रोज अनेक प्राण्यांचा फडशा पाडत असे.

त्यामुळे सर्व प्राणी फारच घाबरले होते. सर्वांनी एकत्र येऊन सिंहाला भेटायचं ठरवलं.

ते भेटीला गेल्यावर, ''काय काम आहे?'' असं सिंहानें गुरकावून विचारलं.








''महाराज, आम्ही तर तुमचे गरीब प्रजाजन'', कोल्हा म्हणाला. ''तुम्ही तुमच्या भुकेपेक्षा जास्त प्राणी मारत आहात. अशाने इथे कोणी प्राणी शिल्लक राहाणार नाही आणि मग तुम्ही उपाशी राहाल. म्हणून आम्ही एक बेत आखला आहे. तुमच्या जेवणासाठी रोज एक प्राणी पाठविण्याचं आम्ही ठरवलं आहे.''

२०८९



"ठीक आहे," सिंहाने गर्जना केली. "पण जर एखादा दिवस तुम्ही मला माझं अन्न पोचवायला चुकलात तर मात्र मी तुम्हापैकी वाटेल तेवढयांना मारून टाकेन."





"आम्हाला हे कबूल आहे, महाराज," प्राणी ओरडले.

त्या दिवसानंतर सिंहाकडे रोज एक प्राणी पाठविण्यात येऊ लागला. जेव्हा सशाची पाळी आली तेव्हा एका म्हाताऱ्या सशाला जाण्यास सांगण्यात आलं.

तो अत्यंत चतुर ससा होता. तो हळूहळू चालत, रस्त्यात विश्रांती घेत, सावकाश गेला. पण अखेरीस मात्र पळत पळत सिंहाकडे आल्याची त्याने बतावणी केली.





सिंह एवढा भुकेला होता की त्याने खवळून गर्जना केली, ''केवढा हा उशीर! आणि तू हा एवढासा मला कुठे पुरणार! कोणी पाठवलं तुला इकडे?''

सशाने लवून नमस्कार केला व म्हटलं, ''महाराज, माझं ऐकून तर घ्याल? आम्ही सहाजण तुमच्या जेवणासाठी पाठविण्यात आलो होतो. पण रस्त्यात बाकीचे पाचजण पकडले गेले आणि दुसऱ्या सिंहाने खाऊन टाकले.''

''दुसरा सिंह? कुठे आहे तो?''

''इथून फार दूर नाही, महाराज. तो मलासुध्दा मारणारच होता. पण मी कसाबसा निसटलो आणि इथे पोहोचलो.''







सिंहाने रागावून मोठ्याने गर्जना केली. "कोठे आहे तो दुसरा सिंह, दाखव मला. मारून टाकतो त्याला क्षणार्धात्!"

"चला महाराज," तो ससा म्हणाला, "मी तुम्हाला त्याच्याकडे घेऊन जातो."





ससा सिंहाला जंगलातील एका विहिरीजवळ घेऊन गेला.
''तो पहा, महाराज, तो तिथे तळाशी रहातो,'' त्याने विहिरीकडे बोट दाखवून सांगितलं.







सिंहाने विहिरीत डोकावून पाहिले, पाण्यात त्याला स्वत:चेच प्रतिबिंब दिसले त्याला वाटले हाच तो दुसरा सिंह. त्याने रागाने गर्जना केली. विहिरीतून अधिक मोठी गर्जना झाली. खरे म्हणजे तो नुसता प्रतिध्वनी होता. पण हे त्या सिंहाला कळलेच नाही. संतापून त्याने विहिरीत उडी घेतली व तो बुडून मेला.

ससा आनंदात घरी परतला.

[illegible]
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८८९ दिनांक ....
विषय [illegible]

BVBK-0402781

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.